गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
● वर्ष १ ले ● अंक १०९ वा ● मंगळवार ०५ सप्टेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 109 | Date : 05 /09/2023 | blow : Tuesday, | Page 4 | Price 4

### मराठा आरक्षणाच्या हालचालींना आता वेग

## राज्य सरकार मराठा समाजाच्या पाठीशी, मुख्यमंत्री शिंदेंची ग्वाही



मुंबई : जालना जिल्ह्यातील अंतरवाली सुराटी गावात मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीमार प्रकरणी आणि एकूणच मराठा आरक्षणप्रकरणी सरकारच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. लाठीमार झाल्याप्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिनशर्त माफी मागितली असून, लाठीमार करणाऱ्यांची चौकशी करून, कडक कारवाई करण्याचं आश्वासन फडणवीसांनी दिलंय. त्याचप्रमाणे, मराठा समाजाला आरक्षण मिळावं हीच राज्य सरकारची भूमिका असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलंय. तसेच राज्य सरकार मराठा समाजाच्या पाठीशी असल्याचा निर्वाळाही शिंदेंनी दिलाय. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आम्ही तिघांनी लाठीमाराचा आदेश दिला, हे सिद्ध करून दाखवा, ताबडतोब राजकारण सोडून देऊ, असं वक्तव्य केलंयमराठा आरक्षणासंदर्भात आज मंत्रीमंडळ उपसमितीची बैठक अखेर संपली आहे. या बैठकीमुळे जालन्यातील घटनेनंतर मराठा आरक्षणाच्या हालचालींना आता वेग आला आहे या बैठकीनंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री माध्यमांशी बोलत होते.

लाठीचार्जचे आदेश मंत्रालयातून झाले असा समज लोकांमध्ये निर्माण केला जात आहे. गोवारी मारले गेले तो आदेश मंत्रालयातून आला होता का? मावळला जो मृत्युमुखी पडले होते तेव्हा ते आदेश तेव्हाच्या मुख्यमंत्री यांनी आदेश दिला होते का? त्यावेळी मग का राजीनामा दिला नाही? असा सवाल फडणवीसांनी केल आहे. सरकार हे करतय हे दाखवण्याचा प्रयत्न होता लोकांना देखील कळतंय हे राजकारण सुरू आहे.२०१८ साली आपण कायदा केला उच्च न्यायालयाने तो कायदा मान्य केला. देशात फक्त तमिळनाडू । पान २ वर

### सरकारने पहिलेच पाढे पुन्हा वाचले, मनोज जरांगेंची पहिली प्रतिक्रिया

जालना : मुख्यंमत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी काही वेळेपूर्वी पत्रकार परिषद घेऊन आम्ही मराठा आरक्षणाच्या बाबतीत सकारात्मक असल्याची माहिती दिली. तसेच काही आश्वासन देखील यावेळी देण्यात आले आहेत. मात्र, सरकारची ही भूमिका म्हणजे पहिलेच पाढे त्यांनी वाचले असल्याची प्रतिक्रिया उपोषणकर्ते मनोज जरांगे यांनी दिली आहे.



दरम्यान, माध्यमांशी बोलतांना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मी केलेली मागणी आतापर्यंत अंमलबजावणीला गेली नाही. सरकारच्या बैठकीत आरक्षणाबाबत निर्णय झाला नसावा असं वाटतंय. त्याची लोक आल्यावर अधिकृत माहिती मिळेल. सरकारने मराठा आरक्षणाचा आदेश घेऊन यावा, उगाच बैठका आणि चर्चेचे गुऱ्हाळ करू नये. सरकारचा अधिकृत निरोप काय येतो हे पहावे लागेल असे जरांगे म्हणाले. आम्ही सरकाच्या शिष्टमंडळाच्या निर्णयाची आतुरतेने वाट बघतोय. पण आरक्षणाचा जीआर आल्याशिवाय आंदोलन संपणार नाही. आज जर यावर निर्णय झाला नाही, तर उद्यापासून मी पाणी पिण्याचं देखील बंद करणार असल्याचे उपोषणकर्ते मनोज जरांगे म्हणाले आहेत.

### राज्यात पुन्हा मान्सून सक्रिय होणार; भारतीय हवामान विभागाचा दिलासादायक अंदाज

पुणे : संपूर्ण राज्य पावसाची प्रतीक्षा करत असताना भारतीय हवामान विभागाकडून दिलासादायक माहिती देण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र



निर्माण होण्याची शक्यता असून, राज्यात ५ सप्टेंबरनंतर मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होण्याची चिन्हे आहेत. गेल्या काही दिवसांपासून राज्यात पावसाने ओढ दिल्याने चिंताजनक परिस्थिती निर्माण झालीये. सप्टेंबर सुरू होऊनही अद्याप राज्यातील काही धरणांमध्ये पुढील वर्षभरासाठीचा पुरेसा पाणीसाठा जमा झालेला नाही. तसेच काही जिल्ह्यांमध्ये पिके, जनावरांचा चारा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मोसमी पाऊस पुन्हा कधी सक्रिय होणार याकडे सर्वांचेच डोळे लागले आहेत.

कोकणात शनिवार (३ सप्टेंबर) रोजी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकणातील काही भागांमध्ये मध्यम ते जोरदार स्वरुपाच्या पावसाने हजेरी लावली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात हवामान विभागाकडून यलो अलर्ट देण्यात आलाय. या जिल्ह्यांमधील काही भागांमध्ये तुरळक पाऊस बरसणार असल्याचं देखील हवामान विभागाकडून सांगण्यात आलंय. । पान २ वर

### शासन आपल्या दारी अभियान...

## शासकीय विभागांनी योजनांच्या लाभार्थ्यांची माहिती विहित प्रपत्रात भरून सादर करावी

### निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांचे निर्देश

सोलापूर/प्रतिनिधी : 'शासन आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत पंढरपूर येथे १० सप्टेंबर रोजी नियोजित असलेल्या कार्यक्रमासाठी प्रत्येक शासकीय विभाग प्रमुखांनी दिनांक १ एप्रिल २०२३ पासून विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या नावांची यादी विहित प्रपत्रात भरून दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी पर्यंत प्रशासनाला सादर करावी, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती पवार बोलत होत्या. यावेळी राज्यात उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक सार्वजनिक बांधकाम विभाग जि. प. कार्यकारी अभियंता कुलकर्णी, तहसीलदार गीता गायकवाड, तहसीलदार दत्तात्रय मोहोळे, करमणूक कर अधिकारी तथा पालकमंत्री कक्षाचे नागू वाकसे व अन्य विभाग प्रमुख उपस्थित होते.

निवासी उप जिल्हाधिकारी पवार पुढे म्हणाल्या की, १० सप्टेंबर रोजी पंढरपूर येथे 'शासन आपल्या दारी' या अभियानाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम नियोजित असून, या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून येणाऱ्या लाभार्थ्यांची विभाग, तालुका व गाव निहाय यादी तयार करून ही यादी तात्काळ जिल्हा प्रशासनाला सादर करावी. या यादीमध्ये दिनांक १ एप्रिल २०२३ पासून शासकीय योजनांचा लाभ मिळालेले लाभार्थीच असले पाहिजेत याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सुचित केले.


*आपले सरकार पोर्टल, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष व पालकमंत्री कक्षाकडील तक्रारींचा निपटारा तात्काळ करावा-। पान २ वर

## रांजणगाव येथे 'इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर'; केंद्राकडून पहिल्या टप्प्यात ६२ कोटींचा निधी वर्ग


### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र शासनाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मानले आभार

मुंबई : राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स धोरणानुसार पुण्याजवळील रांजणगाव येथे महाराष्ट्रातील पहिला 'इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (एचउ) प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने पहिल्या टप्प्यातील ६२ कोटी ३९ लाख रुपयांचा निधी एमआयडीसीकडे वर्ग केला आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र शासनाचे आभार मानले आहेत.

देशात इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी केंद्र शासनाने देशात सुधारित इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (ईएमसी २.०) अंमलबजावणी सुरु केली आहे. देशात नोएडा, कर्नाटक, तमिळनाडू या



राज्यात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन केंद्रे असून तेथे विविध बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भारतीय स्टार्ट अप्स यांनी युनिट सुरू केली आहेत. रांजणगाव येथे २९७.११ एकर जागेवर 'इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर' उभारणीस ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी केंद्राने मान्यता दिली आहे. या प्रकल्पाची किंमत ४९२ कोटी ८५ लाख १९ हजार रुपये असून त्यात केंद्र शासनाकडून २०७ कोटी ९८ लाख रुपये वित्तीय सहाय्य । पान २ वर



## कोरोना काळात सामान्यांचे उत्पन्न घटले, राजकीय पक्ष झाले श्रीमंत

नवी दिल्ली : कोरोना महासाथीच्या काळात लाखो लोकांचे रोजगार हिरावले गेले. तर, अनेकांच्या वेतनात, उत्पन्नात घट झाली. मात्र, दुसरीकडे राजकीय पक्षांच्या देणगीत वाढ झाली. २०२०-२१ आणि २०२१-२२ या आर्थिक वर्षांमध्ये, कोरोना महामारीमुळे लॉकडाऊननंतर रोजगार गमावल्यामुळे किंवा पगारात कपात झाल्यामुळे लोकांचे उत्पन्न कमी झाले. मात्र, याच काळात देशातील आठ प्रमुख राष्ट्रीय पक्षांच्या संपत्तीत वाढ झाली. २०२०-२१ मध्ये, या ८ राजकीय पक्षांची मालमत्ता ७२९७.६१ कोटी रुपये होती. त्यानंतर पुढील वर्षी २०२१-२२ मध्ये ८८२९.१५ कोटी इतकी झाली. म्हणजेच अवघ्या एका वर्षात या पक्षांच्या संपत्तीत सुमारे २१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. निवडणूक सुधारणांवर काम करणाऱ्या 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक । पान २ वर

### भाजप सर्वात श्रीमंत राजकीय पक्ष

एडीआरच्या अहवालानुसार, २०२०-२१ मध्ये, भाजपने ४९९०.१९ कोटी रुपयांची एकूण संपत्ती घोषित केली होती. २०२१-२२ मध्ये एका वर्षानंतर त्यात २१.७ टक्क्यांची वाढ होऊन ६०४६.८१ कोटी रुपये इतकी झाली. काँग्रेसने २०२०-२१ मध्ये ६९१.११ कोटी रुपयांची संपत्ती घोषित केली होती, जी २०२१-२२ मध्ये १६.५८ टक्क्यांनी वाढून ८०५.६८ कोटी रुपयांवर गेली आहे.

### आंदोलनाची एसटीला धग; २० बस जाळल्या,१३ कोटींचे नुकसान

मुंबई : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथील अंतरवाली सराटी येथे आंदोलन करणाऱ्या गावकऱ्यांवर पोलिसांनी लाठीमार केल्याचे पडसाद मराठवाड्यासह राज्यभरात उमटले. जालन्यात सायंकाळच्या सुमारास लाठीमार झाल्यानंतर त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटू लागली. मराठा आरक्षण आंदोलनावर झालेल्या लाठीमारानंतर उसळलेल्या हिंसक प्रतिक्रियेची धग एसटी महामंडळाला बसली आहे. काही ठिकाणी एसटी बसेस जाळण्यात आल्यात. तर, काही मार्गांवरील वाहतूक बंद करण्यात आली. त्याच्या परिणामी एसटी महामंडळाला आर्थिक फटका बसला आहे.

आधीच आर्थिक संकटात असणाऱ्या एसटी महामंडळाला । पान २ वर

## मराठा समाजबांधव यांच्यावर लाठीहल्ला करणाऱ्यावर कठोर कारवाईसाठी युवक काँग्रेसच्या वतीने तहसिलदार यांना निवेदन




अक्कलकोट/प्रतिनिधी: मराठा समाजाची आरक्षणाची मागणी रास्त असुन शांततेचे आंदोलन करणाऱ्या मराठा समाजबांधव व भगिनीवर लाठीहल्ला करणाऱ्या वर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी सोमवारी अक्कलकोट येथे युवक काँग्रेसच्या वतीने तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले. त्याप्रसंगी युवा नेते शिवराज म्हेत्रे बोलत होते. अंतरवाली (सराटी) ता. अंबड जि. जालना येथे शुक्रवारी मराठा आंदोलकांवर झालेल्या भ्याड हल्याचा जाहीर निषेध व हल्ला करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी अंतरवाली (सराटी) ता. अंबड जि. जालना येथे मराठा आरक्षण साठी उपोषणास बसलेल्या जरांगे पाटील या मावळ्याने दि २९ ऑगस्ट २०२३ पासून चालू केलेले आमरण उपोषण उधळून लावण्यासाठी पोलिसांचा प्रचंड फौज फाटा घेऊन हे आंदोलन चिरडून

कढण्यासाठी मराठा समाजातील महिला लहान मुले वयस्कर माणसे व तरुण यांच्यावर अमानुष लाठीचार्ज व रबरी गोळ्यांचा आणि बळाचा गैरवापर करण्यात आला व आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सरकार कडून करण्यात आला.

त्याचा अक्कलकोट युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. व हल्ला करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी अन्यथा युवक काँग्रेस मराठा बांधवांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरेल असा इशारा दिला. याबाबत लेखी निवेदन तहसिलदार बाळासाहेब शिरसाट यांना देण्यात आले. यावेळी युवा नेते शिवराज म्हेत्रे, बाबासाहेब पाटील, कुरनुरचे सरपंच व्यंकट मोरे आदीसह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. । पान २ वर

## दलित आदिवासी ओबीसी मराठा सर्व समाजाला सोबत घेऊन रिपब्लिकन पक्ष मजबूत करा

### केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे रिपब्लिकन कार्यकर्त्यांना आवाहन

बोईसर : अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे. मराठा समाजातील गरिबांना आर्थिक निकषावर आरक्षण द्यावे ही मागणी करुन रिपब्लिकन पक्षाने सर्वप्रथम मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला आहे. जालन्यात मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीमाराचा आम्ही निषेध करतो. या हल्ल्याची उच्च स्तरीय चौकशी व्हावी तसेच मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने सर्वतोपरी प्रयत्न करावेत असे वक्तव्य रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. बोईसर येथील टिमा हॉल येथे पालघर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण शिबीर




आयोजित करण्यात आले होते.त्यात प्रमुख मार्गदर्शन करताना ना.रामदास आठवले बोलत होते.

यावेळी विचारमंचावर कुणबी सेना प्रमुख विश्वनाथ पाटील; रिपाइंचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; रिपाइंचे राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्य आणि पालघरचे निरीक्षक सुरेश बारशिंग; ठाणे प्रदेश अध्यक्ष बाळाराम गायकवाड; प्रदेश सरचिटणीस श्याम शेवाळे; पालघर जिल्हा अध्यक्ष सुरेश जाधव; युवक आघाडी जिल्हा अध्यक्ष सचिन लोखंडे सरपंच लक्ष्मीबाई चांदणे; नरेंद्र करंकाळे; रोहिणी गायकवाड; आशाताई दहाट; आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

मच्छिमार समाजाचा कोळी बांधवांचा मासेमारीचा परंपरागत व्यवसाय अडचणीत येणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी. एखादा चांगला प्रकल्प राज्यात । पान २ वर

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

समोर अंधार दिसत असला तरीही त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.

## संपादकीय

### तर खर्च करणे टाळावे...

वर्तमानपत्रात किंवा टीव्हीवर येणाऱ्या आर्थिक फसवणुकीच्या बातम्या जवळपास एकाच पॅटर्नच्या असतात तरी लोक का फसतात? याचा विचार केला असता अर्थसाक्षरतेचा अभाव हेच कारण लक्षात येते. कळते पण वळत नाही किंवा कळत पण नाही आणि त्यामुळे समजायचा वगैरे संबंध नाही किंवा आपल्या गैरसमजांना कुरवाळत व आपण आर्थिकक्षेत्रात खूप तज्ज्ञ किंवा हुशार आहोत. त्यामुळेच कुठले विषय समजूनच घ्यायचे नाही असे काहीसे अर्थसाक्षरतेबद्दल आपले झाले आहे. भारतात गेल्या काही वर्षात अंदाजे १ लाख कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे. यात पैसे बुडाले ते सर्वसामान्य लोकांचे. अतिलाभाचा हव्यास हे मुख्य कारण याचे आहे. वाढती महागाई आणि वयानुसार वाढणाऱ्या खर्चाची तरतूद प्रत्येकाने उत्पन्न सुरू असतानाच करायला हवी. तुमची मुले तुमची म्हातारपणी काठी जरूर असतील, पण त्यांच्यावरील आर्थिक बोजा होणे हे पण टाळले पाहिजे. पुढच्या पिढ्यांना तुमच्यापेक्षा जास्त स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. स्वतःच्या चुकांमधून शिकल्यानेसुद्धा आर्थिक साक्षरता येत असते. आर्थिक नियोजन हा विषय तज्ज्ञांकडून ज्ञान प्राप्त केल्यानंतर आणखी स्पष्ट होतो. काही सोपे नियम पाळले, आर्थिक शिस्त पाळली, तर आपणही अर्थसंपन्न होऊ शकतो. आपल्या आजूबाजूला अशी अनेक उदाहरणे आहेत की, त्यांनी नियम आणि शिस्त पाळून ते अर्थसंपन्न झाले आहेत. फक्त गैरसमजांना कुरवाळत बसल्याने व आर्थिक नियोजनात आपण खूप हुशार आहोत, हा अतिआत्मविश्वास आपले नुकसानच करतो. अर्थसाक्षरता म्हणजे सतत सुरू असणारा सुंदर प्रवास आहे. यामध्ये तुम्ही काही सोपी कौशल्यं आत्मसात केली, तर तुम्हीही लवकर अर्थसंपन्न होऊ शकाल. उत्पन्न व खर्च याबाबत स्पष्टता असणे फार महत्त्वाचे आहे. तुमच्या बचतीच्या सवयीपेक्षा तुमच्या खर्च करण्याच्या सवयीच तुम्हाला लवकर अर्थसंपन्न बनवत असतात. तुम्ही किती पैसे मिळवता व ते कसे कुठे खर्च करता याचे व्यवस्थापन करणे हे खूप महत्त्वाचे आहे. हातात उत्पन्न नाही, पण ते येईल या आशेवर खर्च करणे टाळावे. असे केल्यास आपली आर्थिक उन्नती शक्य आह

## संघर्ष ,समर्पण व सातत्याचे प्रतीक शब्दयात्री भैरवनाथ कानडे

### शिक्षक दिन विशेष

परंपरेने चालत आलेल्या मळवाटा सोडून नवीन पायवाट निर्माण करण्याचे सामर्थ्य कमी लोकांमध्ये असते .पण काही लोक अशी पायवाट निर्माण करून तिचा राजरस्ता करतात .असेच एक ध्येय ,धाडस ,संघर्ष . समर्पण , सातत्य आणि ध्यासाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटणारे शब्दयात्री तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा येथील श्री . भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक भैरवनाथ खंडू कानडे यांनी महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२२-२३ या वर्षीचा सर्वोच्च पुरस्कारावर आपल्या कार्यकर्तुत्वाची मोहर उमटवली आहे . ग्रामीण भागात उपक्रमशील व उत्कर्षशील शिक्षक म्हणून कार्य करणाऱ्या या सेवाव्रती शिक्षकाच्या संघर्षशील व प्रेरणादायी आणि उत्कंठावर्धक कार्याची ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या निमित्ताने घेतलेली दखल अनेक सामान्य व्यक्तींना आपण जीवनात असामान्य कार्य करतांना अनुभवले आहे. हे असामान्य काम त्यांच्या प्रतिभेने, कष्टाने, संयमाने व सचोटीने मिळविलेले असते, प्रसंगी मान-सन्मान बाजूला सारत अपमानही सहन केलेला असतो. ध्येयाप्रती प्रचंड निष्ठा, समर्पितता व जमिनीवर घट्ट पाय रोवून सर्व प्रकारच्या प्रसंगांना सामोरे जाण्याची सिद्धताच असे कार्य घडवून आणते. तेथे भाग्य, नशीब वगैरे गोष्टींना फारसे महत्व न राहता माणसाचे कर्मच श्रेष्ठ ठरते. अशाच प्रकारे शून्यातून विश्व निर्माण करणारे व ज्यांच्या कर्तृत्वाचा मला नेहमीच आदर व अभिमान वाटतो असं व्यक्तिमत्व म्हणजेच भैरवनाथ कानडे

या जन्माचे व्रत ऐसे की, दीप उजळता मनी राहावा...

चहूबाजूच्या अंधारातून आपण आपला मार्ग पहावा...

याच वृत्ती ने निरपेक्षपणे आपण सातत्याने कार्य करत आहात....प्रेरणा आणि प्रोत्साहन मानवी जीवनासाठी शक्ती वर्धकाचे काम करत असते. हीच प्रेरणा आपण अनेकांच्या मनात निर्माण केली आहे. एखादं लहान रोपटं मोठं होत असताना आणि त्याचा पुढं वृक्ष होताना त्याला अनेक वादळांना, ऊन वाऱ्याचा सामना करावा लागतो.तसेच आपल्या मानवी जीवनाचंही आहे. आपलं जीवन जगत असताना आपल्यालाही नको त्या संकटांचा सामना करत वाटचाल करावी लागते,आपला मार्ग ठरवावा लागतो. अश्याच एका खडतर मार्गावर मार्गक्रमण करीत तुम्ही खूप मोठा आदर्श उभा केला आहे.

श्री.कानडे यांचा जन्म चिकुंद्रा या उस्मानाबाद जिल्ह्यातील छोट्याशा खेडेगावात झाला. हातावर पोट असूनही त्यांच्या जन्मदात्यांनी सरांच्या शिक्षणासाठी प्रचंड खस्ता खाल्ल्या. कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थितीने होरपळून निघालेल्या सरांच्या सामाजिक जाणीवा अधिकाधिक प्रगल्भ होऊ लागल्या. परिवर्तन घडवून आणण्याची जिद्द मनात निर्माण झाली. समाज मनाचे आणि विविध पुस्तकांचे चौफेर वाचन घडले व यातूनच एका संवेदनशील वृत्तीच्या व्यक्तिमत्वाचा जन्म झाला.

श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात गेले २१वर्ष अध्यापनाचा अनुभव सोबतीला घेत अपेक्षित वर्तन बदलासाठी त्यांनी समृद्ध शाळा आणि सक्षम विद्यार्थी या कृतार्थ भावनेतून त्यांनी वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले . पायाभूत संचितावर समृद्ध शाळा व सक्षम विद्यार्थी घडविण्याच्या कामी त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे .

ज्ञानरचनावादी अध्यापनावर त्यांनी प्रामुख्याने भर दिला .प्रत्येक आव्हानांना पेलण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्याच्या दृष्टीने स्पर्धात्मक युगाची त्यांनी ओळख करून दिली .प्रचंड संघर्ष करून स्वतःला वेगळ्या उंचीवर घेऊन जाणाऱ्या व्यक्तीच सातत्याने इतरांच्या विकासासाठी धडपडत असतात. पूर्वी च्या काळी शिक्षकाला मास्तर म्हणत असत कारण मास्तर म्हणजे जो मातेच्या स्तरावर जाऊन शिकवतो तो मास्तर आणि अशा या शिक्षण क्षेत्रातील कर्मयोग्यास महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे .ही त्यांच्या कर्तुत्वाची योग्य ती घेतलेली दखलच म्हणावी लागेल.सामाजिक शैक्षणिक , राजकीय सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय असेच आहे... माणूस म्हणून जन्म घेतलेल्या प्रत्येक माणसाचं जीवन एखद्या कथे सारखं असतं, त्याला कादंबरी सुद्धा म्हणता येईल. या कथांना यशोकथा, संघर्षकथा, सुखंतिका, किंवा शोकांतिका अशा कथा प्रकारांमध्ये ही विभागता येईल. पण त्यातला कोणतीही कथा प्रकार असला तरी, प्रतिभेला जोपासलं, वाढवलं आणि विधायक पद्धतीने विकसित केलं तर आयुष्याचं सोनं व्हायला वेळ लागत नाही. अशी माणसं मग समाजाचं ही सोन करण्यासाठी धडपडतात. आणि मग हजारो आयुष्य सुवर्णांकित होतात.

परिस्थितीने पिचल्याने, मनातील असंतोष विविध वर्तमापत्रातून जगासमोर येवू लागला. शिक्षक, कलाकार , सूत्रसंचालक, पत्रकार , एक उत्तम वक्ता आणि लेखक म्हणून समाजमान्यता मिळाली. अनेक पुस्तके प्रकाशित होऊ लागली. यामध्ये प्रामुख्याने ''ज्ञानकिरण'' गुरू रविदास संपादीत पुस्तक, सोशल इंजिनिअर हा गौरव ग्रंथ, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे चरित्र,राजर्षी शाहुंचे शैक्षणिक विचार आदींचा समावेश आहे. या ग्रंथसंपदा मोठ्या प्रमाणात वाचकांच्या पसंतीस उतरल्या आहेत. याशिवाय राज्य व राष्ट्रीय शैक्षणिक परिषदांमधून वेगवेगळ्या विषयांवर शोधनिबंधाचे सादरीकरण व तज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांनी विशेष कार्य केले आहे .आपण शिक्षण क्षेत्रात एक नवीन मानदंड निर्माण केला आहे जो यापुढे कित्येक पिढ्याना मार्गदर्शक ठरणार आहे..आपण करत असलेल्या या उत्तुंग कार्याबद्दल आपणास आजवर अनेक पुरस्कारांनी अलंकृत केले गेले आहे.सार्वजनिक जीवनात आपल्या ह्या प्रगल्भतेचा अनुभव अनेकांना येत असतो. त्यामुळेच आपल्या कुटुंबियांसह सामाजिक जीवनातील विस्तारित कुटुंबातील सदस्य संख्या दिवसेंदिवस वाढते आहे . त्यातून हि प्रगल्भता व स्नेह अधिकच वृद्धिंगत होत असतो. मा कानडे सरांच्या संघर्ष कथेच्या माध्यमातून मला आजच्या पिढीला एकच संदेश द्यायचा आहे तो म्हणजे मी एकच तुम्हाला सांगेल ते म्हणजे परिस्थिती च रडगाण न गाता, मिळेल ती संधी स्वीकारा. आयुष्याचा बी प्लॅन नेहेमी तयार ठेवा. पण हे करीत असताना जे तुम्हाला वाटेल ते करा, मन लावून आणि पूर्ण समर्पित होऊन करा ! तुमच्या कार्याला, अभ्यासाला, कष्टांना आणि समर्पणाला दाद देणारं कुणीतरी आहेच नक्की !

**प्रा डॉ सुनिल रुपचंद धनगर, पुणे**
**(महाराष्ट्राचा युवावक्ता व सुप्रसिद्ध निवेदक)**
**संपर्क- ७०६६७७९९९०**

पान १ वरुन

### जोपर्यंत मराठा समाजाला..

चौकट १) शिवराज म्हेत्रे - युवा नेता काँग्रेस- शांततेने चाललेला आंदोलन उधळून लावण्यासाठी पोलिसांचा प्रचंड फौज फाटा घेऊन हे आंदोलन चिरडून कढण्यासाठी मराठा समाजातील महिला लहान मुले वयस्कर माणसे व तरुण यांच्यावर अमानुष लाठीचार्ज व रबरी गोळ्यांचा आणि बळाचा गैरवापर करण्यात आला व आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सरकार कडून करण्यात आला.हे निंदयीय आहे. दोषींवर कठोर कारवाई करावी अन्यथा काँग्रेसला न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागेल.

यावेळी युवा नेतृत्व मा. शिवराज म्हेत्रे,यांच्या नेतृत्वाखाली तर युवक काँग्रेस ता अध्यक्ष बाबासाहेब पाटील,काँग्रेसचे माजी नगरसेवक सुनिल खवळे,माजी नगरसेवक विकास मोरे,कुरनुरचे सरपंच व्यकंट मोरे,युवक शहराध्यक्ष मुबारक कोरबु,दुधनी कृ उ बा संचालक इरण्णा धसाडे, शाकिर पटेल, विनीत पाटील,जगदीश हळगोदे, राहुल साळुंखे,नितिश राठोड, संभाजी बेडगे स्वामीनाथ कलकोटे, सतिश चिंचोळीतील सर्व बांधव उपस्थित होते.

### दलित आदिवासी ओबीसी..

येत असेल तर दोन्ही बाजूंनी विचार करून मार्ग काढला पाहिजे अशी वाढवण बंदर बाबत ना.रामदास आठवले यांनी भूमिका मांडली.पालघर मध्ये उद्योग प्रकल्प येत आहेत. त्यात स्थानिक भूमिपुत्रांना नोकरीत प्राधान्य द्यावे. पालघर जिल्हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. जव्हार मोखाडा येथे अद्याप अनेक प्रश्न आहेत. रस्त्यांचा उद्योगाचा शेतमालाला चांगला भाव देण्याचा प्रश्न आहे.या प्रश्नांवर रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी काम करून आदिवासी बांधवांना सोबत घ्यावे. दलित ;आदिवासी ;ओबीसी मराठा; मुस्लिम ; लिंगायत ; ख्रिश्चन सर्व जाती धर्मियांना सोबत घेऊन रिपब्लिकन पक्ष मजबूत करा असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.

पालघर नवीन जिल्हा निर्माण झाला आहे.मात्र अद्याप येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन निर्माण झाले नाही. त्यासाठी जमीन देण्याची शासनाने घोषणा केली आहे.मात्र अद्याप डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन निर्माण झाले नाही. जिल्ह्यातील जनतेची मागणी आहे यामागणीसाठी आपण लवकर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊ असे आश्वासन ना.रामदास आठवले यांनी दिले. पालघर मध्ये सुपर स्पेशॅलीटी हॉस्पिटल उभारले पाहिजे या मागणीसह विविध प्रश्न सोडविण्याकडे आपण लक्ष देऊ असे आश्वासन ना.रामदास आठवले यांनी दिले.

विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीकडे देशाच्या विकासाचा मुद्दा नाही. ते केवळ प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना विरोध करण्यासाठी एकत्र आले आहेत. विरोधकांनी कितीही प्रयत्न केले तरी येत्या सार्वत्रिक निवडणुकीत मोदीच पुन्हा प्रधानमंत्री होतील असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केला.

चांद्रयान २ मोहीम अपयशी ठरल्या नंतर प्राधानमंत्री मोदींनी आपल्या संशोधकांना हिम्मत आणि प्रोत्साहन देऊन चांद्रयान ३ साठी अधिक निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे आता जी चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली आणि जगात भारताचा अधिक मान वाढला त्यात आपल्या संशोधकांचे योगदान मोठे असुन त्या यशामागे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचेही मोठे योगदान आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले. देशात ८० कोटी गरिबांना मोफत अन्नधान्य देण्याचे काम करताना आज पर्यन्त ४ कोटी लोकांना प्रधानमंत्री मोदींनी घर दिले आहे. ९ कोटी पेक्षा जास्त लोकांना मोफत गॅस सिलेंडर दिले आहे अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी यावेळी दिली.

### शासकीय विभागांनी योजनांच्या..

जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागांच्या अनेक तक्रारी आपले सरकार पोर्टलवर प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. तरी सर्व संबंधित विभागाने त्यांच्याकडे ऑनलाईन आलेल्या तक्रारींचा निपटारा तात्काळ करून त्याबाबतचा अहवाल आपले सरकार पोर्टल वर अपलोड करावा. अनेक विभागाकडे शंभर ते दीडशे दिवस तक्रारी प्रलंबित दिसून येत आहे. ते अत्यंत चुकीचे असून प्रत्येक विभागाने याची गांभीर्यपूर्वक दखल घेऊन आपल्याकडील प्रलंबित असलेल्या तक्रारी विहित कालावधीत निपटारा करणे गरजेचे असल्याचे निर्देश निवासी जिल्हाधिकारी पवार यांनी दिले. एकूण ३७ तक्रारी प्रलंबित असून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस विभाग ग्रामीण, कृषी विभाग व अन्य विभागाकडे तक्रारी प्रलंबित आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडे मागील महिन्यात ६६ तक्रारी आलेल्या होत्या त्या तक्रारीच्या अनेक विभागांनी निपटारा केलेला नाही. या सर्व तक्रारीच्या निपटारा १५ सप्टेंबर २०२३ पूर्वी करावा, असे निर्देश निवासी जिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिले. जिल्हा परिषदेकडे २१ अर्ज प्रलंबित असून पोलीस आयुक्त कार्यालय ६, भूमी अभिलेख २, कृषी विभाग ३ व अन्य विभागाच्या तक्रारी प्रलंबित आहेत. त्याप्रमाणेच पालकमंत्री कक्षाकडेही प्रलंबित असलेल्या सर्व तक्रारींचा निपटारा तात्काळ झाला पाहिजे याबाबत संबंधित विभागाने दक्षता घ्यावी असेही त्यांनी यावेळी सूचितकेले.

### कोरोना काळात सामान्यांचे..

रिफॉर्म्स' (-ssociation for Democratic Reforms) या संस्थेने ही आकडेवारी जाहीर केली आहे. ADR ने २०२०-२१ आणि २०२१-२२ या कालावधीत ८ राष्ट्रीय राजकीय पक्षांच्या मालमत्ता आणि देणग्यांचा आढावा घेऊन अहवाल प्रसिद्ध केला आहे. या ८ राजकीय पक्षांमध्ये भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (NCP), बहुजन समाज पक्ष (BSP), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (CPM), तृणमूल काँग्रेस (TMC), नॅशनल पीपल्स पार्टी (NPEP) यांचा समावेश आहे.

बसपाच्या संपत्तीत घट

एडीआरच्या अहवालानुसार, बहुजन समाज पक्ष हा एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे ज्यांच्या संपत्तीत या काळात घट झाली आहे. बसपाची एकूण मालमत्ता २०२०-२१ मध्ये ७३२.७९ कोटी रुपये होती. २०२१-२२ मध्ये कमी होऊन ६९०.७१ कोटी रुपये झाली. तृणमूल काँग्रेसच्या संपत्तीत मोठी वाढ झाली असल्याचे ADR ला आढळून आले आहे. तृणमूल काँग्रेसने २०२०-२१ मध्ये आपली संपत्ती १८२.००१ कोटी रुपये असल्याचे सांगितले होते. यात २०२१-२२ मध्ये १५१.७० टक्क्यांनी वाढून ४५८.१० कोटी रुपये इतकी झाली.

राजकीय पक्षांकडे थकबाकी...

ADR ने आपल्या अहवालात राजकीय पक्षांकडे असलेल्या थकबाकीचा उल्लेख केला आहे. या अहवालानुसार, या सर्व ८ पक्षांवर २०२०-२१ मध्ये १०३.५५५ कोटी रुपयांची देणी होती. काँग्रेसकडे सर्वाधिक ७१.५८ कोटी रुपयांची थकबाकी होती. तर सीपीएमकडे १६.१० कोटींची थकबाकी होती. २०२१-२२ मध्ये काँग्रेसकडे असलेली थकबाकी ही ४१.९५ कोटी रुपयांवर आली. तर सीपीएमची थकबाकी १२.२१ कोटी रुपयांवर आली. भाजपकडे ५.१७ कोटी रुपयांची थकबाकी होती. म्हणजे एका वर्षात काँग्रेसने २९.६३ कोटींची देणी दिल्यात. तर, सीपीएमने ३.८९ कोटी रुपये आणि तृणमूल काँग्रेसने १.३० कोटी रुपयांची देणी दिली.

ICAI मार्गदर्शक तत्त्वे असूनही, राजकीय पक्ष ज्या वित्तीय संस्था, बँका किंवा एजन्सीजकडून कर्ज घेतले त्यांची नावे उघड करत नाहीत, असेही ADR च्या अहवालात म्हटले आहे.

### आंदोलनाची एसटीला धग;..

आंदोलनाच्या हिंसक प्रतिक्रियेचा फटक बसला आहे. जालन्यातील लाठीमाराची बातमी वेगाने पसरू लागल्यानंतर जालना आणि परिसरात ठिकठिकाणी आंदोलन सुरू झाले. खबरदारीचा उपाय म्हणून एसटी महामंडळाने आपली वाहतूक बंद ठेवली. अनेक ठिकाणी आंदोलकांनी एसटीला लक्ष्य केल्याने महामंडळाला फटका बसला.

मराठा आरक्षण आंदोलनामुळे गेल्या तीन दिवसात एसटीच्या २५० आगारांपैकी ४६ आगारातील वाहतूक पूर्णतः बंद आहेत. यामध्ये प्रामुख्याने अहमदनगर, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, जालना, नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्ह्यात बंदचा मोठा प्रभाव दिसून आला आहे याच जिल्ह्यातील बहुतांशी एसटी आगार बंद आहेत. गेल्या तीन दिवसांमध्ये आंदोलनात एसटी बसेसना आग लावण्याची घटना घडली. यामध्ये एसटीच्या २० बसेस पूर्णत: जळालेल्या आहेत. तर, १९ एसटी बसेसची तोडफोड करण्यात आली. यामुळे एसटीचे सुमारे ५ कोटी २५ लाखाचे नुकसान झाले आहे.

गेल्या तीन दिवसात बंद असलेल्या आगारामुळे आणि इतर आगारातील अंशतः रद्द केलेल्या फेऱ्यामुळे एसटी महामंडळाच्या तिकीट उत्पन्नापैकी सुमारे ८ कोटी रुपयाचे उत्पन्न बुडाले आहे. सोमवारी, संध्याकाळ ४ वाजेपर्यंत एसटीच्या एकूण बस फेऱ्यांपैकी सुमारे ६२०० फेऱ्या जिल्हा बंद आंदोलनामुळे रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आज दिवसभर सुमारे दोन कोटी ६० लाख रुपये महसूल बुडाला आहे.

### राज्य सरकार मराठा समाजाच्या

आणि महाराष्ट्र सरकारचा कायदा केला. आमचे सरकार बदललं आणि ९ सप्टेंबरला २०२० ला स्थगिती आली. उद्धव ठाकरे एक वर्षे मुख्यमंत्री होते. २०२१ पासून उद्धव ठाकरे तुम्ही वटहुकूम का काढला नाही? असा सवाल देखील फडणवीसांनी उपस्थित केला.

ओबीसी आरक्षणाप्रमाणे मराठ्यांना अनेक तरतुदी लागू केल्या आहेत. सरकार मराठा आरक्षणबाबत अतिशय गंभीर आहे. जालना घटनेवरुन सध्या राजकारण सुरू आहे. महाविकास आघाडीने अनेकदा घोळ घातला. हे आरक्षण महाविकासआघाडीने सुप्रीम कोर्टात घालवले. मराठा आरक्षणासज्ञठी केवळ महायुतीने निर्णय घेतले आहेत. जे नेते मराठा समाजाचा पुळका आला असे दखवत आहेत त्यांनी आरक्षण घालवल्याचा आरोप देवेंद्र फडणवीसांनी केला आहे. मराठा समाजाला आवाहन करतो की जो बंद चालला आहे एसटी जाळली त्यामुळे राज्याचे नुकसान झाले आहे. या पूर्वी मराठा समाजाची जी आंदोलन झाली त्याचे देशपातळी कौतुक झाले आहे. पण आता गालबोट लावण्याचा प्रयत्न झाला. आज जी बैठक झाली त्यात सकारात्मक चर्चा झाली. काल मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत चर्चा झाली. लवकरच तोडगा निघेल, मात्र तोपर्यंत शाांतता राखा, असे आवाहन अजित पवारांनी केले आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ते टिकले पाहिजे ही भूमिका आमची आहे. आम्ही टास्क फोर्सची स्थापना केली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका सरकारची आहे. मराठा समाज मागासलेला आहे आणि ते सिद्ध व्हायला हवे. सरकार पूर्णपणे मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या बाजूने आहे. ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना जे फायदे मिळतात ते देत आहोत. आंदोलनांच्या आडून शांतता बिघडवण्याचा प्रयत्न होत आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

### राज्यात पुन्हा मान्सून सक्रिय

त्यामुळे शेतपिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील १७ दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने दडी मारली होती. त्यामुळे पिकांनी माना टाकायला सरुवात केली. मात्र रविवार सकाळपासून जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली. काही ठिकाणी कुठे तुरळक तर काही ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावलीये. या पावसामुळे खरीपातील कपाशी, सोयाबीन आणि तूर या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. यावर्षी खरीप हंगामात ८ लाख ५० हजार हेक्टर लागवड झाली. जून आणि जुलैमध्ये अतिवृष्टीमुळे ३ लाख हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले होते.

रविवारी संध्याकाळी साडेआठच्या सुमारास हिंगोली शहरासह ग्रामीण भागामध्ये विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. मागील अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतातील पिके पाण्याअभावी कोमेजली होती. पण या पिकांना या पावसाचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. पावसामुळे आनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले होते. तर उकाड्यापासून त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाल्याचं चित्र सध्या आहे. जर पाऊस पुढील काही दिवस पावसाचा जोर राहिला तर पाणीटंचाईचं संकट कमी होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. ऑगस्ट महिन्यात पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पाणीटंचाईचं संकट ओढावलंय. त्यामुळे सध्या संपूर्ण राज्यभरात पावसाची प्रतीक्षा होत आहे.

### रांजणगाव येथे 'इलेक्ट्रॉनिक्स

उपलब्ध होणार आहे. यातील ६२ कोटी ३९ लाख रुपयांचा पहिला हप्ता केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने एमआयडीसीकडे वर्ग केला आहे.रांजणगाव येथे उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात आयएफबी, एलजी आणि गोगोरो ईव्ही स्कूटर यासारख्या कंपन्यांचा सहभाग असेल. या प्रकल्पामुळे हा परिसर 'इलेक्ट्रॉनिक क्लस्टर' म्हणून नावारूपास येईल, अधिक उद्योजक, कंपन्या तेथे आकर्षित होऊन त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला आहे. हा इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत आणि एमआयडीसीने विशेष परिश्रम घेतले असून त्यांचेही मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले आहे.

कोणीतरी बर्फाला विचारले ..,
"आपण एवढे थंड कसे.?"
बर्फाने अतिशय छान उत्तर दिले ...
"माझा भूतकाळ पण पाणी
आणि माझा भविष्यकाळ पण पाणीच ...!
मग मी गरम कोणत्या गोष्टीवर होऊ ...?"
"आयुष्य खूप सुंदर आहे एकमेकांना समजून घ्या व जिव लावा"

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पाल्यात राहून पोटाची खळगी भरण्यासाठी फिरणाऱ्या घिसाडी समाजाची भटकंती



नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडे : भटक्या विमुक्त जाती जमातींच्या गिसाडी नागरीकांच्या व्यथा मांडली परंतू आज ही त्यांच्या नशीबी भटकंतीच आहे गावो गावी जाऊन जिथे गाव तिथे काम म्हणत पोटाची खळगी भरण्यासाठी लोखंड व पोलादावर आपल्या घामाचा हातोडा मारत पोट भरणे हा त्यांचा धंदा आहे या भावनेनेच काम करत आसतात परंतू या गिसाडी समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे काम प्रशासनाने करायला पाहिजे कारण यांचे जिवन एकाच गावात गेले पाहिजे प्रशासनाच्या अनेक योजना राबविल्या जातात त्या योजना पासुन वंचित राहीले जात नाहीत यामध्ये मतदान यादीत नावे समाविष्ट करणे, तसेच आधारकार्ड, जातिचे दाखले,रेशन कार्ड सह अन्य सुविधा उपलब्ध करून देणे तहसील कार्यालयाच्या सर्व सुविधा मिळणे गरजेचे आसताना सुद्धा हा समाज गावो गावी फरत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आसतात .

याबाबत माहिती असी की भटके विमुक्त जाती जमातीचे जे लोक शिक्षणा पासुन वंचित आहेत त्यांचे शिक्षण खुप महत्वाचे आहे म्हणून महाराष्ट्रातील सर्व काही नागरीकांची भटकंती करावी लागत आहे आशा नागरीकांना शासनाने दिलासा देणे गरजेचे आहे . आसाच एक गिसाडी समाज जालना जिल्ह्यातील अंबड गावा पासुन जवळच असलेल्या एका खेडेगावातुन आपल्या उदार निर्वाहा साठी नळदुर्ग शहरात दाखल झालेले अजय चव्हाण,अनिता चव्हाण , पायल चव्हाण, सपना चव्हाण , देविदास सोळुंके , रेखा सोळुंके, अंजली सोळुंके, कोमल सोळुंके , रोहीत सोळुंके , रमेश सोळुंके , मिरा सोळुंके अदिजन नळदुर्ग मरीआई मैदानावर उतरले आसुन मारीआई मंदीराच्या समोर एक पाल मारून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आसताना दिसत आहेत पोलादा पासुन तयार होणारे शेती साठी लागणारे छोटे अवजारे कु-हाडी नांगर अदि वस्तू तयार करण्या साठी गोवो गावी भटकत आसतात या भटकंती मुळे अनेक योजना पासून वंचित राहातात आशा फिरती नागरीकांची एकाच गावात कायमची सुविधा देऊन एकाच गावात राहाण्या करिता प्रवृत्त करावे जेने करून त्यांना त्यांच्या हक्कांची जागा व मालकीचे घर मिळेल रेशन कार्ड, जातीचा दाखला व अन्य बाबतीतही त्याना ताबडतोब सुविधा निर्माण करून दिल्या जाव्यात त्यांना जिल्हाधिकारी यांनी एका आदेशान्वये जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारे विशेष कॅम्प घेण्यासाठी आदेशित करावेत तालुक्यात या कामासाठी सामाजिक क्षेत्रात आसणाऱ्या स्वयंसेवी संस्था जातीने लक्ष घालुन यांचा सर्वे करावा आणी राहात असलेले वैदू , गिसाडी व मसनजोगी समाज त्यांच्या पालावरती जाऊन त्यांचा सर्वे करणे आजच्या काळाची गरज आहे ' महादेव कोळी मरगम्मा अनेक जो समाज भटकत फिरतो त्या समाजाचे शैक्षणिक आणी सामाजिक परिवर्तन होणे गरजेचे आहे

# वटवृक्ष मंदिर समितीच्या कार्यपद्धतीने भाविकांचे समाधान : आ.आजगांवकर

अक्कलकोट/प्रतिनिधी : अलीकडील काही काळात भाविकांना स्वामींची प्रचिती मोठ्या प्रमाणावर येत आहे. त्यामुळे येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील स्वामी समर्थ दर्शनाकरिता येणाऱ्या भाविकांची संख्या खूपच वाढलेली आहे. येणाऱ्या भाविकांना सर्वोत्तम स्वामी दर्शन व्यवस्था करणे हे मंदिर समितीचे प्रथम कर्तव्य आहे, ही बाब जाणून घेऊन समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी स्वतः आध्यात्मिक जीवनशैली आत्मसात करून स्वामी सेवेत आपले जीवन अर्पण केले आहे. भक्तांच्या गर्दीमध्ये मंदिरात ते स्वतः पुढाकाराने उभे राहून सर्व स्वामी भक्तांना सुलभ दर्शन कसे घेता येईल याचे नेटाने नियोजन करीत असतात यानिमीत्ताने वटवृक्ष मंदिर समितीच्या या नियोजनाने सर्व भाविकांना सुलभ स्वामी दर्शन लाभून समाधान लाभते त्यामुळे वटवृक्ष मंदिर समितीच्या कार्य पद्धतीने भाविकांचे मनोभावे स्वामी दर्शनाने समाधान होत असल्याचे मनोगत पुणे विभागीय शिक्षक मतदार संघाचे आमदार जयंतराव आजगांवकर यांनी व्यक्त केले.



ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. या प्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी आमदार आजगावकर व त्यांच्या समवेत असलेले प्रा.मनोज जगताप, प्रा. प्रकाश सुरवसे, श्रवण बिराजदार, शहाजी ठोंबरे, जयदीप बिराजदार, अशोक कदम यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. या प्रसंगी आमदार आजगावकर बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी यांच्या समवेत फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे सदस्य संतोष जाधव-फुटाणे यांच्या कार्याचाही त्यांनी विशेष गौरव केला. यावेळी मंदिर समितीचे ज्येष्ठ लिपिक संजय पवार, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, स्वामीनाथ लोणारी, श्रीकांत मलवे, वैभव जाधव, चंद्रकांत कवटगी, अविनाश क्षीरसागर, आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

# वेदपाठक परिवारांच्या वतीने अक्कलकोट शहरात पांचाळ समाजातील गरजू मुलांचे राज्यस्तरीय मोफत मुंजीचे आयोजन




अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार चंद्रकांत रामचंद्र वेदपाठक व वेदपाठक परिवाराच्या वतीने पांचाळ समाजातील सोनार, सुतार, लोहार, मुर्तीकार, तांबड या समाजातील मुलांचे राज्यस्तरीय मोफत मुंजीचे आयोजन करण्यात आले असून दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत पालकांनी आपल्या (बटूचे)

मुलांचे नावे नोंदवावीत असे आवाहन कार्यक्रमाचे यजमान व संयोजक चंद्रकांत वेदपाठक यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

पांचाळ समाजातील १६ संस्कार, धार्मिक शिक्षणात मौजीबंधन हे एक महत्वाचे संस्कार आहे. मुलांच्या लग्ना अगोदर वयाच्या सातव्या / आठव्या वर्षाच्या आसपास मुलांचे मौजीबंधन संस्कार करणे आवश्यक असते. त्या शिवाय मुलांच्या लग्नाला परवानगी नसते. अनेक कारणामुळे अनेक मुलांची मुंज रखडले गेले असते. याची समाजिक भान व जाणिव ठेऊन चंद्रकांत वेदपाठक व वेदपाठक परिवारांनी यापूर्वीच दि. ८ मे १९९६ रोजी अक्कलकोट येथे १०१ मुलांचे राज्यस्तरीय पांचाळ समाजातील गरीब व गरजू मुलांचे मोफत मुंजीचे धार्मिक शिक्षण व दिक्षा समारंभाचे यशस्वी आयोजन केले होते. त्यावेळी सर्वच वर्तमान पत्रानी याची दखल घेऊन त्यास भरपूर प्रसिद्धी दिली होती. २७ वर्षानंतर पुन्हा एकदा चंद्रकांत वेदपाठक व वेदपाठक परिवार दुसऱ्यांदा पांचाळ समाजातील गरजू मुलांचे राज्यस्तरीय मोफत मुंज (मौजीबंधन) करण्याचे आयोजन केले असून सदर धार्मिक विधी अक्कलकोट येथील एस.टी.स्टँड समोरील श्री मल्लिकार्जून मंगल कार्यालय, येथे रविवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.१७ वा. करण्याचे निश्चित केले आहे. मोफत मुंजीच्या कार्यक्रमात सहभागी बटू व त्यांच्या पालकांना कोणतेही अर्थिक खर्च करण्याची आवश्यकता नाही. पालकांनी बटूसह स्वखर्चाने प्रवास करुन अक्कलकोट येण्याचे आहे. बाकीचे संपूर्ण विधीचे खर्च वेदपाठक परिवार करणार आहे. मोफत मुंजीचे धार्मिक विधी, बटूचे मुंजीच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी बटू (मुला) च्या पालकानी आपल्या मुलाची नावे कार्यक्रमाचे यजमान व संयोजक चंद्रकांत वेदपाठक, अक्कलकोट यांचेकडे (मो.९८५००४८१११) या व्हॉटस् ॲप नंबर वर दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत नावे नोंदवावीत असे आवाहन वजा विनंती विठ्ठल वेदपाठक, सुरेश वेदपाठक, अनिल वेदपाठक यांनी पत्रकार परिषदेत केली आहेत. त्याप्रसंगी राहुल वेदपाठक, आकाश वेदपाठक, सागर वेदपाठक, किरन वेदपाठक, ओंकार वेदपाठक, उदय नरेगल, दिपक पोतदार, आदी हे उपस्थित होते.

# आदर्श शिक्षक भैरवनाथ कानडे सर यांचा दलित पँथर संघटने कडून सत्कार

नदगांव/अजिंक्य मस्के :भैरवनाथ माध्यमिक विद्यालय चिकुंद्रा ता.तुळजापूर येथील आदर्श सहशिक्षक तथा पत्रकार भैरवनाथ कानडे यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूर व मित्र परिवारांच्या वतीने नळदुर्ग ता.तुळजापूर येथे यथोचित सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च असा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२२-२३ हा पुरस्कार श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालय चिकुंद्रा येथील सहशिक्षक तथा पत्रकार व उत्कृष्ट निवेदक भैरवनाथ कानडे यांना मिळाल्या बद्दल त्यांचा नळदुर्ग येते दलित पँथर संघटनेच्या वतीने व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तालुका शाखा तुळजापूर व मित्रपरिवारांच्या वतीने येथील पत्रकार संघाच्या संपर्क कार्यालयात यथोचित सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे यांनी केले तर सुत्रसंचलन पत्रकार संघाचे एस.के.गायकवाड यांनी केले व आभार प्रदर्शन पत्रकार संघाचे मंत्रालयीन प्रतिनिधी प्रकाश गायकवाड यांनी केले. याप्रसंगी परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग चे संस्थापक सचिव मारूती बनसोडे, क्रषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूर चे संचालक अँड.रामचंद्र ढवळे,पत्रकार सतिश राठोड आदींची शुभेच्छा पर भाषणे झाली. यावेळी पत्रकार संघाचे संजय पिसे, किशोर धुमाळ, विजय पिसे,अजिंक्य मस्के, भटक्या विमुक्त आदिवासी पारधी समाज संघटनेचे संस्थापक पंडीत भोसले,भिम-आणणा संघटनेचे धर्मराज देडे,सह पत्रकार श्रीकांत सुरवसे लाडू माने आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# संविधानातील सामाजिक न्याय उपेक्षितांपर्यंत पोहचला पाहिजे : ई.झेड.खोब्रागडे

पुणे/प्रतिनिधी :भारतीय संविधानाने या देशातील प्रत्येक नागरिकांना न्याय,समता, स्वातंत्र्य आणि बंधुता प्रदान केली आहे. सर्व नागरिकांच्या विकासासोबतच वंचित, उपेक्षित असलेल्या मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी संविधानात विशेष तरतूद केली आहे. मात्र संविधानातील हा सामाजिक न्याय अजून उपेक्षित वंचित घटकांच्या पर्यंत पोहचला नाही त्यामुळे नागपूर येथील मांग गारुडी समाजाच्या रहाटेनगर सारख्या अनेक वस्त्याआज ही मूलभूत सोयीसुविधा पासून वंचित असल्याचे मत संविधान फाऊंडेशन संस्थापक सेवानिवृत्त सनदी अधिकारी ई.झेड.खोब्रागडे यांनी बार्टीच्या ऑनलाईन बैठकीत बोलतांना व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)पुणे या संस्थेने नागपूर येथील रहाटे नगर येथील मांग गारुडी समाजाच्या विविध प्रश्नांसंबंधी दिनांक १ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित केलेल्या ऑनलाईन बैठकीत खोब्रागडे बोलत होते.

बार्टी संस्थेचे महासंचालक मा .सुनील वारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत खोब्रागडे पुढे म्हणाले की, बार्टी संस्थेने रहाटे नगर , नागपुर येथील मांग गारुडी समाजाचे सर्वेक्षण करून जो अहवाल बनविला आहे तो प्रशंसनिय आहे.

यासाठी बार्टीचे त्यांनी अभिनंदन केले शासनाने या वस्तीत आधार कार्ड, रेशन कार्ड,जातीचा दाखला,जमिनीचे मालकी,हक्क, घरकुल योजना,शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात यासाठी बार्टी संस्थेने पुढाकार घेऊन सामाजिक न्यायाचे तत्व अंमलात आणावे. अनु. जातीच्या विकासासाठी बार्टी राबवित असलेल्या विविध योजनांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. बार्टी संस्थेचे महासंचालक मा सुनिल वारे यांच्या संकल्पनेतून बार्टी कार्यालयात दररोज सकाळी संविधान उद्देशिका सामुहिकपणे वाचनाचा उपक्रम सुरु केल्याबद्दल त्यांनी या उपक्रमाचे स्वागत करुन मा.महासंचालक सुनिल वारे यांचे हार्दिक अभिनंदन केले.

या बैठकीच्या समारोपात मा. महासंचालक यांनी बार्टी संस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्यावर संशोधन करून नव्या पिढीपर्यंत हा वारसा नेण्यासाठी बार्टी कटीबद्ध असल्याचे सांगितले बार्टीच्या विविध योजनांचा लाभ घेऊन उच्च पदस्थ झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे स्नेमिलन आयोजित करण्यात येईल.तसेच संविधान कक्षाच्या माध्यमातून बार्टी हर घर संविधान हा उपक्रम सुरु करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

या बैठकीला रहाटे नगर, नागपुरमध्ये सामाजिक कार्य करणारे प्रमोद काळबांडे, खुशाल ढाक हे ऑनलाईन उपस्थित होते तर बार्टी मुख्यालयात विभाग प्रमुख स्नेहल भोसले, अनिल कारंडे वृषाली शिंदे, निबंधक इंदिरा अस्वार,सतीश पाटील, संशोधन विभागाचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ. प्रेम हनवते, संविधान कक्षाचे सुमेध थोरात , नागपूर तेथील बार्टी उपकेंद्राचे प्रकल्प अधिकारी शितल गडलिंग, तुषार सूर्यवंशी इत्यादी उपस्थित होते.

# सैनिक टाकळीचा पैलवान सुबोध पाटील याने जरंडेश्वर येथे मानाची गदा पटकावली



सैनिक टाकळी/संजय चव्हाण : पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत जरंडेश्वर केसरी ही मानाची गदा पटकावली. सुबोध पाटील यांनी अल्पावधीतच बऱ्याच मोठ्या कुस्त्या मारून सैनिक टाकळीचे नाव लौकिक केले आहे. आता सर्वच जण सुबोध पाटील हा भविष्यातला महाराष्ट्र केसरी म्हणून पाहत आहेत. सुबोध पाटलांना सैनिक टाकळी करा कडून भावी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या

# सी.बी.खेडगी महाविद्यालयाच्या थ्रोबॉल संघाने जिल्हा स्तरीय शालेय थ्रोबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये उज्ज्वल यश

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयाच्या थ्रोबॉल संघाने जिल्हा स्तरीय शालेय थ्रोबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये उज्ज्वल यश संपादन केल्याने या थ्रोबॉल संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जिल्हा स्तरीय थ्रोबॅल क्रीडा स्पर्धा सोलापूरच्या सिंहगड कॉलेज येथील क्रीडांगणावर नुकताच मोठ्या उत्साहात पार पडल्या. यामध्ये १९ वर्षाच्या खालील मुले थ्रोबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात खेडगी महाविद्यालय संघाने मंगरुळे हायस्कूल वर २-० सेट नी विजय मिळविला.



या विजयी संघात विशाल गोविंदे(कर्णधार), अमित कलशेट्टी,योगेश राठोड, सिद्धराम विभूते,शशीधर टोणे, अमरजीत कदम, सुरेश यादवाडे,राहुल काळे, समर्थ चव्हाण,विशाल कनगी, सुनील भाले,समर्थ हडपद या खेळाडूंचा समावेश होता. विजयी संघाचे माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी, संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे, व्हाईस चेअरमन अशोक हारकूड, प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोटे, उपप्राचार्य बसवराज चडचण, पर्यवेक्षका वैदेही वैद्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.विजयी संघाला क्रीडा शिक्षक सोहेल शेख, डॉ. दत्तात्रय बिराजदार, डॉ. सोमनाथ राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

# जालना घटनेचा निषेध निफाड मध्ये कडकडीत बंद

निफाड/प्रतिनिधी :जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्या अंतरवाली सराटी गावात मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून शांततेच्या मार्गाने सुरु असलेल्या उपोषणस्थळी पोलिसांकडून अचानक पणे केलेल्या अमानुष लाठीचार्ज करून आणि गर्दी पांगवण्यासाठी हवेत गोळीबार करण्यात आला . ही घटना अतिशय दुर्दैवी आहे महाराष्ट्रातील सकल मराठा समाज आक्रमक झाला असून ह्याच गोष्टीच्या निषेधार्थ निफाड येथे कडकडीत बंद पाळण्यात आला आहे सर्व व्यवसायिकांनी आपले व्यवसाय (अत्यावश्यक सेवा वगळता)दिवसभर बंद ठेवून मराठा समाज आरक्षणास पाठिंबा दिला.सकाळी १० वा. छत्रपती शिवाजीमहाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले असून घडलेल्या घटनेचा



उपस्थितांनी तीव्र निषेध व्यक्त केला..या प्रसंगी.बापुसाहेब कुंदे.विक्रम रंधवे.जावेद शेख आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.तहसीलदार शरद घोरपडे यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी संजय कुंदे ,विक्रम रंधवे, बापूसाहेब कुंदे, सचिन धारराव दिलीप कापसे ,प्रमोद गाजरे, विजय धारराव , साहेबराव कापसे, चेतन कुंदे, गोकुळ जाधव, गणेश कापसे, गोकुळ जाधव ,चंद्रभान जाधव, आकाश गोळे ,विशाल कापसे ,चंद्रभान जाधव ,जावेद शेख, आदी मान्यवर उपस्थित होते.कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी निफाड पोलीस स्टेशन च्या वतीने पि.एस.आय.आनंद पटारे व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते...

# तिसऱ्या श्रावणी सोमवारी फुलले अचलेर चे मल्लिकार्जुन मंदिर तर सोलापूरच्या श्री सिध्देश्वर मंदिरात शिवभक्तांचा प्रचंड उत्साह

सोलापूर/महेश गायकवाड: श्रावणातल्या तिसऱ्या श्रावणी सोमवारी अचलेर सह अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील श्री काशी लिंग मंदिर तसेच तुळजापूर जवळील वडगांव येथील श्री सिद्धेश्वर मंदिर आणि उमरगा जवळील कपिलधार मंदिर आणि सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर मंदिर आज असंख्य फुलांनी सजले होते तर भक्तांच्या प्रचंड गर्दिने ही सर्व मंदिरे फुलून गेली होती, अचलेर चे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर तसेच श्री बसवेश्वर मंदिरात आणि सोलापूर येथील ग्राम दैवत श्री सिध्देश्वर मंदिर येथे आणि जेऊर येथील काशीलिंग मंदिरात शिवभक्तांचा प्रचंड उत्साह पाहण्यासाठी मिळाला पहाटे पासूनच दर्शनासाठी भक्तांच्या रांगा प्रत्येक मंदिरात लागल्या होत्या अचलेर येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन तसेच सोलापूर येथील श्री मल्लिकार्जुन ही दोन मंदिरे पुरातन काळातील असून दोन्ही मंदिरे ही हेमाडपंथी आहेत तर जेऊर येथील काशी लिंग मंदिर हे दाक्षिणात्य मंदिर आहे. 'बम..बम..भोलेच्या' गजरात शिवभक्तांनी अचलेर च्या मल्लिकार्जुन मंदिरांसह बसवेश्वर महाराज मंदिरात तसेच अचलेर पासून जवळ च असलेल्या घोळसगाव येथील ग्रामदैवत महादेव मंदिरात दर्शनासाठी गर्दी केले होते,

सोलापूर चे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर तसेच तुळजापूर जवळील वडगाव येथील श्री सिध्देश्वर तर उमरगा जवळील महादेव, मंदिर आणि कपिळधार येथील अमृतेश्वर मंदिरात आज भक्तांनी गर्दी केल्यामुळे ही सर्व मंदिरे फुलून गेली होती, तर फुलांच्या सजवटीने सजली होती,

आज पहाटे पासूनच शिवभक्तांची मोठी गर्दी उसळली होती. प्रत्येक मल्लिकार्जुन मंदिरा समोर असलेल्या नंदी ला बेल पत्री अर्पण करून भक्त लोक मंदिरात जाऊन शिवलिंगाचे दर्शन घेतले तर

महादेव मंदिरातील नंदीसह तेथील देवांच्या मूर्तीला बेल चढवून पूजा अर्चा केलीआज श्रावनातला तिसरा म्हणजे मधला सोमवार असल्यामुळे अचलेर चे श्री मल्लिकार्जुन मंदिर सोलापूर चे श्री सिद्धेश्वर मंदिर तसेच मल्लिकार्जुन मंदिर जेऊर येथिल श्री काशी लिंग मंदिर तसेच वागदरी येथील परमेश्वर मंदिर आणि उमरगा व तुळजापूर जवळच्या महादेव मंदिरात आणि अमृतेश्वर मंदिरात आणि कपिलधार मंदिरात



शिवभक्तांची वर्षभर वर्दळ असते. सोलापूर येथील देवस्थानतर्फे दर सोमवारी मंदिर परिसरातून पालखी सोहळ्याचे आयोजन केले जाते. याशिवाय महाशिवरात्री व श्रावणातल्या चारही सोमवारी श्रींच्या पंचमुखी मुखवट्याचा पालखी सोहळा आयोजित केला जातो. आज शिवभक्तांची गर्दी उसळली होती. पहिल्या दोन सोमवारप्रमाणे आज तिसऱ्या सोमवारी ही मोठ्या प्रमाणात सर्वच शिव मंदिरात भक्तांची गर्दी होती

दरम्यान, दुसऱ्या श्रावणी सोमवारप्रमाणेच राबविण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे विश्वस्त हरीश शिंदे यांनी सांगितले. भाविकांना एकशेएक किलो राजगिरा लाडूबरोबरच खिचडीचे वाटप करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी गर्दी होती.

# माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे वाढदिवस मुंबईत साजरा

मुंबई: माजी केंद्रीय गृहमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त,, जेष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे, आमदार प्रणितीताई शिंदे, चेतन नरोटे यांच्या प्रमुख



उपस्थितीत,, मुंबई येथे सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते केक कापुन साजरा करण्यात आला. स्वकर्तुत्वाने व नेतृत्वाने आभाळाला गवसणी घातलेले, राजकारण आणि समाजकारण आपल्या कवेत घेतलेले भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री, ऊर्जामंत्री, लोकसभेतील काँग्रेसचे मा. नेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्राचा सलग नऊ वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा पहिले विक्रम केलेले माजी अर्थमंत्री, अभ्यासू, सुसंस्कृत असे सोलापूरचे सुपुत्र सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जेष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे, आमदार प्रणितीताई शिंदे यांच्या उपस्थितीत गौतम अपार्टमेंट मुंबई येथे मा. सुशीलकुमार शिंदे साहेब यांच्या हस्ते केक कापुन वाढदिवस साजरा करून शुभेच्छा देताना सोलापुर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, मा. नगरसेवक विनोद भोसले, प्रवक्ते अशोक निंबर्गी, सुशील बंदपट्टे, रमेश व्हटकर, राज सलगर, रूपेश गायकवाड, शंकर नरोटे, जयप्रकाश पोल, मंजूनाथ पोल, शाहु सलगर, ओंकार सुरवसे आदी उपस्थित होते.

# अनिल कदम यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा निफाड तहसीलवर धडक मोर्चा

## अवाजवी वीजभारनियमन व मराठा आंदोलक लाठीमाराचा निवेदन देवून निषेध

**निफाड तालुक्यात विद्युत वितरण कंपनीच्या अवाजवी वीज भारनियमनामुळे शेतकऱ्यांची पिके जळून चालली आहे. त्याचे गांभीर्य विज कंपनीला नसल्याने आज शांततेच्या मार्गाने निफाड तहसिलवर धडक मोर्चा शिवसेनेने काढला आहे. शेतकऱ्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन आठ दिवसात याबाबत प्रशासन व वीज कंपनीने सुधारणा न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर शिवसेना स्टाईलने धडक देवून ठिय्या मांडला जाईल. त्यावेळी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उद्रेकास प्रशासन जबाबदार राहील. –अनिल कदम (मा.आमदार, निफाड)**



निफाड/प्रतिनिधी : कमी पर्जन्यमानामुळे निफाड तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असताना अतिरिक्त वीज भारनियमन व वीज कंपनीच्या अनागोंदी कारभाराच्या विरोधात आज निफाडचे माजी आमदार अनिल कदम यांनी आक्रमक पवित्रा घेत निफाड तहसिल कार्यालयावर धडक मोर्चा काढला. यावेळी जालना जिल्ह्यातील मराठा आंदोलकांवर केलेल्या लाठीमाराचा निषेध करत तहसीलदार शरद घोरपडे यांना निवेदन दिले.

अनिल कदम यांच्या नेतृत्वाखाली निफाड बाजार समिती पटांगनापासून मोर्चास प्रारंभ करण्यात आला. भगवे झेंडे व निषेध फलकांनी संपूर्ण निफाड भगवेमय झाले होते. यावेळी शेतकऱ्यांनी बंद करा.. बंद करा, वीज भारनियमन बंद करा.. शेतकरीविरोधी व लाठीचार्ज करणाऱ्या भाजप सरकारचे करायचे काय.. खाली डोके वर पाय.. अशा घोषणा दिल्या. तसेच उद्धवसाहेब आगे बढे.. आदित्य साहेब आगे बढे.. हम तुम्हारा साथ है...! हा आवाज कुणाचा.. शिवसेनेचा... अनिल आण्णा कदम आगे बढे.. हम तुम्हारे साथ है.. अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिकांनी यावेळी दिल्या. धडक मोर्चा तहसिल कार्यालयावर धडकल्यानंतर त्याचे रूपांतर सभेत झाले. यावेळी तहसीलदार शरद घोरपडे, वीज कंपनीचे नाशिक कार्यकारी अभियंता राजाराम डोंगरे, चांदवड कार्यकारी अभियंता काळू माळी, ओझरचे सहायक अभियंता संदिप शिंदे, निफाडचे निलेश नागरे, लासलगावचे प्रविण सोनवणे आदी उपस्थित होते.

मा.आमदार अनिल कदम यांनी यावेळी विज कंपनीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत विज भारनियमनाबाबत आठ दिवसात सुधारणा न झाल्यास नाशिकला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देवून ठिय्या मांडनार असल्याचा निर्वाणीचा इशारा दिला. यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुधीर कराड, शिवा पाटील सूरासे, भाऊलाल कुटे, रतन पाटील वडघुले, प्रभाकर मापारी, बंडू अडसरे, रामबाबा बोडके, आशिष मोगल, सुरेश खैरनार, शरद कुटे या शेतकऱ्यांनी विजेच्या संदर्भातील आपल्या व्यथा प्रशासनासमोर मांडल्या. तहसिलदार शरद घोरपडे व कार्यकारी अभियंता राजाराम डोंगरे यांनी सदर समस्या तातडीने सोडवन्याचे आश्वासन यावेळी दिले. संपूर्ण महाराष्ट्रात कमी पावसामुळे विजेची मागणी वाढल्याने अतिरिक्त वीज भारनियमन होत असल्याचे सांगून त्यावर उपाययोजना सुरु असल्याचे राजाराम डोंगरे यांनी सांगीतले. मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीमाराचाही यावेळी अनिल कदम यांनी निषेध करत निवेदन दिले. यावेळी मोर्चात शिवसेना तालुकाप्रमुख सुधिर कराड, युवासेना जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे, उपजिल्हाप्रमुख निलेश पाटील, बाजार समिती संचालक गोकुळ गिते, राजेश पाटील, जि.प सदस्य दिपक शिरसाठ, मा सभापती शिवा पाटील सूरासे, किरन निरभवणे, किरण लभडे, आशिष शिंदे, सत्यजित मोरे, नाना निफाडे, आशिष बागुल, सुनिल कदम, प्रदीप कदम, प्रदीप अहिरे, खंडू बोडके पाटील, भगवान सानप,

शरद नाठे, बाबाजी कुशारे, आबा गडाख, संदिप टरले, बाळासाहेब पावशे, मुकुंदराजे होळकर, संजय धारराव, संजय कुंदे, सोमनाथ पानगव्हाणे, शहाजी राजोळे, अशपाक शेख, गोपाळनाना बोडके, बाळासाहेब जाधव, दिलिप कदम, संजय पगार, भाऊसाहेब कमानकर, चांदोरी सरपंच विनायक पप्पू खरात, अभिजित चोरडीया, सचिन वाघ, बाळासाहेब वाघ, संजय भालेराव, नंदू पवार, सुनिल कुटे, प्रकाश केदार, मचिंद्र वाघ, राजाभाऊ सानप, अरविंद बोरगुडे, दादा बोरगुडे, पोपट कुशारे, स्वप्नील चकोर, मोहन जगताप, किरण शिंदे, लक्ष्मण चकोर, योगेश कुयटे, दिपक शिंदे, मोहन बाजारे, अतूल शिंदे, प्रकाश वाटपाडे, नरेंद्र वाटपाडे, दशरथ रूमने, विश्वास भंडारे, कमलेश भंडारे, किरण सानप, अशोक बागल, भाऊसाहेब खालकर, सुरेश लुंकड, समाधान खेलुकर, गणेश वाणी, सुबोध व्यवहारे, निलेश दराडे, योगेश गावले, करंजगाव सरपंच नंदू निर्भवने, राजेंद्र राजोळे, प्रविण पाटील राजोळे, योगेश राजोळे, शंकर पवार, रोहिदास कामडे, संतोष पवार, सुरेश पावशे, सोमनाथ राजोळे, वसंत राजोळे, अनिल जोगदंड, मंगेश गायकवाड, सचिन पवार यांच्यासह शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.



# दहिटणे महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी श्रीमंत राजेगांवकर यांची निवड

अक्कलकोट/प्रतिनिधी: दहिटणे ता.अक्कलकोट – दहिटणे महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी श्रीमंत राजेगांवकर व उपाध्यक्षपदी महम्मद ताहीर शेख यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.दहिटणे येथील ग्रामपंचायतीची ग्रामसभा मारुती मंदिर सभामंडप येथे पोलीस पाटील भिमाशंकर म्हेत्रे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

प्रारंभी ग्रामसभेचे सचिव ग्रामविकास अधिकारी पी.एल.पवार यांनी मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून सभेपुढील विषय वाचले.यावेळी ग्रामस्थांनी विविध विषयाच्या चर्चेमध्ये सहभाग घेतला.या सभेत महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी श्रीमंत राजेगांवकर व उपाध्यक्षपदी महम्मद ताहीर शेख यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी प्रशासक पी.एल.कोळी साहेब, थोरात साहेब, ग्रामविकास अधिकारी पी.एल.पवार साहेब, माजी सरपंच दौलत मोरे, चन्नवीर बोधले,रविंद्र रसनभैरे, माजी उपसरपंच दिगंबर राजेगावकर एकनाथ शिंदे,अरुण पोपसभट गुरुजी बाळ पाटील, तेजस माने,महेश माने,बाबासाहेब पाटील,नारायण पाटील,भरत राजेगावकर, दिलीप व्हट्टे, पंडीत चौधरी,विलास भस्मे, हर्षवर्धन सोनकांबळे,बाळू शहाणे, शार्दूल रसनभैरे, शेकुंबर मुजावर,शिलार नदाफ, गोविंद मोरे,अजिज नदाफ,लाला साळूंखे,श्रीशैल कुंभार, सोमण्णा माळी, अण्णासाहेब गायकवाड,अप्पाराव चौधरी,देवराज बंदीछोडे,आजी माजी ग्रामपंचायत सदस्य सोसायटी संचालक, महिला बचत गट पदाधिकारी, गावातील महिला ग्रामस्थ व तरुण बहुसंख्येने उपस्थित होते.शेवटी आभार ग्रामपंचायतीचे माजी सदस्य रमेश स्वामी सर यांनी मानले.

# जेऊर येथे काशिविश्वेश्वर मंदिरात रजत सहस्त्रलिंग अभिषेक महोत्सव उत्साहत संपन्न

## ५०० जोडप्यांनी केले सामूहिक इष्टलिंग पूजन



अक्कलकोट/प्रतिनिधी: तालुक्यातील जेऊर येथे स्वयंभू श्री काशिविश्वेश्वर मंदिरात श्रावण मासाचे औचित्य साधत आज तिसऱ्या श्रावणी सोमवारी विश्वशांती व जनकल्याण रजत सहस्त्रलिंग अभिषेक आणि रुद्राभिषेक व होम विधी संपन्न झाला. सुमारे ५०० जोडप्यांनी सामूहिक रजत इष्टलिंग पूजन केले. यावेळी ष. ब्र शिवायोगी शिवाचार्य महास्वामी नविंदगी संस्थान मठ यांच्या नेतृत्वात सदर विधी पूर्ण करण्यात आले. यावेळी सद्गुरू पांडुरंग महाराज जेऊर, श्री ष. ब्र श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी नागणसूर तसेच म.नि.प्र.विर शिवलिंगेश्वर महास्वामी कडबगांव संस्थान मठ कडबगाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री काशिलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील व पदाधिकारी यांच्या संयोजनातून सदर धार्मिक विधी गेल्या दोन दिवसापासून सुरु झालेल्या पाऊस व उल्हासमय वातावरण यात हा कार्यक्रम जल्लोषात साजरा झाला. आज सकाळपासून श्रावण धारा बरसत असूनही कार्यक्रमांस भविकांची मोठी गर्दी होऊन कार्यक्रमांस चांगला प्रतिसाद लाभला. श्री काशिविश्वेश्वर मंदिरात संपूर्ण श्रावण मासात विविध धार्मिक विधी साजरे होतात. दररोज हजारो भाविक येथे येऊन दर्शन घेत असतात. विणा सप्ताह, प्रवचन आणि महाप्रसाद सेवा यामुळे पूर्ण गावात मोठे धार्मिक वातावरण असते त्यातच एकूण ५०० जोडप्यांनी एकत्र येत सामूहिक रजत इष्टलिंग पूजन केले.यावेळी आशीर्वचन करताना शिवयोगी शिवाचार्य महास्वामी म्हणाले कि, श्रावण मासाला पुरातन काळापासून मोठे धार्मिक महत्व आहे. या काळात आपण हे पूजन करीत आहात त्याने आपण खूप भाग्यवान आहात. सर्व ग्रामस्थ आज शिव नामाची आराधना करीत आहात ही चांगली गोष्ट आहे.सर्वांनी रूढी आणि परंपरा याचे जतन करीत चला त्यातून आपले भविष्य उज्वल राहणार आहे.कार्यक्रमाचे संयोजन श्री काशिविश्वेश्वर देवस्थान कमिटी व ग्रामस्थ मंडळी यांनी केले तर सूत्रसंचालन शंकर अजगोंडा यांनी केले. चौकट : आज सकाळपासून पाऊस असूनही मंडप पूर्ण भरलेला होता तब्बल चार तास पूजा विधी व इतर धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे नेमके नियोजन, आकर्षक रजत इष्टलिंग आणि मन भारवणारे विविध धार्मिक विधी आणि पाच हजार पेक्षा जास्त भाविकांना दिला गेलेला महाप्रसाद आदींमुळे कार्यक्रम मात्र कमालीच्या जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाल्याचे पहावयास मिळाले.

# संत नामदेवांची जयंती शासकीय स्तरावर साजरी व्हावी : डॉ.पाथरकर

## पंढरपुरात अ.भा. नामदेव क्षत्रीय महासंघाच्या बैठकीत विविध ठराव एकमुखाने मंजूर

पंढरपूर/प्रतिनिधी: महाराष्ट्र सरकारने कार्तिक एकादशीला संत नामदेव महाराज यांची जयंती शासन स्तरावर साजरी करावी. येथील संत नामदेव महाराजांचे स्मारक तात्काळ उभारण्यात यावे. संपूर्ण देशात शिंपी समाज विविध पोट जातीत विखुरलेला आहे. या समाजाचे संघटन करून एकाच छताखाली काम करण्याचा निर्णय अ.भा. नामदेव क्षत्रीय महासंघाने घेतला घेतला असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. नारायण पाथरकर यांनी सांगितले.



पंढरपूर येथे अ.भा. नामदेव क्षत्रीय महासंघ नवी दिल्ली, शाखा महाराष्ट्र यांची पहिली सर्वसाधारण सभा रविवार ३ सप्टेंबर रोजी योगा भवन येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अध्यक्ष पदावरून डॉ. नारायणराव पाथरकर बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. मुकुंद महाराज नामदास, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष महेश ढवळे तसेच एस. एस. टोनी, रेखा वर्मा, बलजीतसिंग खुरपा, राजपाल जी., मनोज भांडारकर, अनिल गचके, नंदकुमार कोडनुसार, दिनकर पतंगे, कैलास धोकटे, संतोष मुळे, सुर्यकांत भिसे आदी उपस्थित होते.पुढे बोलताना डॉ.पाथरकर म्हणाले, पंढरपूर ते घुमान (पंजाब) वारकरी सदभावना रेल्वे गाडी सुरू करावी. नाशिक येथे आगामी कुंभमेळाच्या ठिकाणी संत नामदेव आखाड्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. समाजातील युवकांना व्यवसाय सुरु करण्यासाठी निधी बँक स्थापन करण्याचेही ठरले आहे. यासह विविध मागण्यांचा ठराव मंजूर करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. ह.भ.प. मुकुंद महाराज नामदास यांनी, सर्व शिंपी समाजातील बांधवांनी एकत्र आले पाहिजे. समाज कार्यासाठी पंढरीच्या पांडुरंगाचे आशिर्वाद आपल्या पाठीशी आहेत. महासंघाच्या कार्यास नामदास परिवाराकडून शुभेच्छा असल्याचे सांगितले.

प्रदेशाध्यक्ष महेश ढवळे म्हणाले, सर्व शिंपी समाज बांधवांनी एकत्र येऊन समाजात एकोपा निर्माण केला पाहिजे.तसेच सर्व शिंपी सह पोट जातीची जनगणना करून प्रदेश स्तरावर कोअर कमिटी करण्यात यावी. संत नामदेव महाराज यांची २०२५ ला संजीवन समाधी सोहळ्यास ६७५ वर्ष पूर्ण होत असून यासाठी केंद्र शासनाचे चलनी नाणे व टपाल तिकीट काढले काढावे व मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करावे पंढरपूर, नरसी ,घुमान येथे यात्री निवास बांधले गेले पाहिजे. पंढरपूर येथील संत नामदेव महाराज यांच्या पायरीचे दर्शन हे आषाढी व कार्तिकी ला वारकरी,भाविकांना सुलभ दर्शन होण्यासाठी मंदिर समितीने लक्ष दिले पाहिजे.असे ढवळे म्हणाले.

याप्रसंगी महासंघाच्या विविध जिल्ह्यातील पदाधिकार्यांच्या निवडी जाहिर करण्यात आल्या. यावेळी देशाच्या १५ राज्यांतून महेंद्र दर्जी ओरीसा (बंगाल), राकेश आर्य (उत्तराखंड), मुकेश नामदेव (हरिद्वार), अरुण नामदेव (मध्य प्रदेश), महेंद्र तांडी (चेन्नई), रमेश परमार (गुजरात), रमेश भीमे (गोवा) यांच्यासह पदाधिकारी, पुरुष व महिला उपस्थित होत्या.

प्रारंभी संत नामदेव शिंपी समाज पंढरपूर यांच्यावतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष गणेश उंडाळे, विश्वस्त राजेश धोकटे सर, जगन्नाथ म्हैंदरकर, दिलीप बंगाळे, दत्ता चांडोले, प्रसाद निकते, युवक संघटनेचे अध्यक्ष शैलेश धट, महेश गाणमोटे, माजी अध्यक्ष राजेश कपडेकर, ज्ञानेश्वर वडे, प्रथमेश परंडकर, दत्तप्रसाद निपाणकार, अक्षय चांडोले, अमर जंवजाळ, निलेश घोकटे, पत्रकार प्रशांत माळवदे, अनिल जवंजाळ, शिवकुमार भावलेकर यांनी परिश्रम घेतले.